सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

संपादक : घनश्याम पाटील

■ वर्ष : ६
■ अंक : ४६
■ पाने : ८
■ पुणे

मूल्य ₹3

www.chaprak.com

■ सोमवार दि. १२ ते १८ डिसेंबर २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

■ Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** ■ Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 12/12/2016

सस्नेह निमंत्रण

**चपराक साहित्य महोत्सव २०१७**

- एकाचवेळी अनेक पुस्तकांचे प्रकाशन
- सुप्रसिद्ध पत्रकार भाऊ तोरसेकर यांची मुलाखत (संवादक – हरिश केंची आणि आबा माळकर)
- 'चपराक प्रकाशन'तर्फे घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय दिवाळी विशेषांक स्पर्धेचे पुरस्कार वितरण
- सागर कळसाईत लिखित 'कॉलेज गेट' कांदबरीतील एका प्रकरणाचे अभिवाचन
- निमंत्रित कवींची बहारदार काव्यमैफल

**वेळ :** गुरुवार दिनांक १९ जानेवारी २०१७ रोजी दुपारी २ ते रात्री ९ पर्यंत | **ठिकाण :** श्रमिक पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ, पुणे

# दु:खाच्या पाखराला मनात घरटे करू देऊ नका : प्राचार्य श्याम भुर्के

## 'चपराक' दिवाळी विशेषांकाला सुखकर्ता प्रतिष्ठानचा प्रथम पुरस्कार

**पुणे, (प्रतिनिधी) :** दु:खाचे पाखरू मनात फडफडत असते पण त्याला मनात घरटे करू देऊ नका. जीवनात नेहमी आनंदी रहा. आनंदी राहण्यासाठी जे काही करता येईल ते करा. एखादी कला जोपासा, दुसऱ्याला आनंदी करण्याचा प्रयत्न करा. नात्यातील संभाषण संपू देऊ नका. संभाषण होणे महत्त्वाचे. मीही सुखी आहे आणि दुसरेही सुखी आहेत अशी भावना नेहमी जोपासा. निराश होऊ नका, असा संदेश सुप्रसिद्ध वक्ते व लेखक प्राचार्य श्याम भुर्के यांनी दिला.

पुण्यातील उद्यान प्रसाद मंगल कार्यालयात सुखकर्ता सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे विविध क्षेत्रातील कलावंतांना आणि उत्कृष्ट दिवाळी अंकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले त्यावेळी भुर्के बोलत होते. यावेळी सुप्रसिद्ध सिने-नाट्य कलावंत लीला गांधी, सुखकर्ता प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मंदाताई नाईक, कार्याध्यक्ष मिलिंद तांबोळी, साहेबराव मांढरे, चंद्रशेखर कोरडे, अशोक कदम, सुरेखा जोशी, मीना पेठकर, माधवी आपटे, सम्राट नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य भुर्के म्हणाले, समाजातील विविध क्षेत्रातील गुणवान व्यक्तिंचा सत्कार सुखकर्ता प्रतिष्ठानतर्फे केला जातोय ही भाग्याची गोष्ट आहे. अच्छे दिनची अपेक्षा सरकारकडून करण्यापेक्षा प्रत्येकाने स्वत:पासून त्याची सुरूवात केली पाहिजे आणि ही सर्व कलावंत, विविध क्षेत्रात काम करणारी मंडळी तेच काम



■ **सुखकर्ता सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे घेण्यात आलेल्या उत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धेचा प्रथम पुरस्कार 'चपराक'ला प्राप्त झाला. सुप्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य श्याम भुर्के आणि सिने-नाट्य कलावंत लीला गांधी यांच्या हस्ते तो स्वीकारताना 'चपराक'चे संपादक घनश्याम पाटील, कार्यालयीन व्यवस्थापक तुषार उथळे पाटील आणि सागर सुरवसे.**

करत आहेत. अशा या चांगल्या भावनेच्या लहरी आपल्याला मोठे, आनंदी, समृद्ध करीत असतात. सर्व माणसे ही एक सारखी नसतात त्यामुळे समोरचा व्यक्ती माझ्यापेक्षा वेगळे वागणार हे गृहीतच धरले पाहिजे. प्रत्येकामध्ये असणारा 'मी'पणा हा समस्या निर्माण करत असतो. आपल्यात असणाऱ्या अहंकाराने प्रश्न निर्माण होत असतात. त्यामुळे हा मीपणा व अहंकार सोडला पाहिजे. कोणत्याही वयात आनंदी व उत्साहात रहायला पाहिजे. नात्यांमधील संभाषण चालू ठेवले पाहिजे तरंच घरं टिकतील. राग म्हणजे दुसऱ्याच्या चुकीसाठी स्वत:ला त्रास करून घेणे. त्यामुळे हा राग सोडून आनंददायी वातावरण निर्माण केले पाहिजे. नोटाबंदीचा त्रास करून न घेता रांगेत उभा राहून मी दहशतवादा विरोधात लढतोय असे मानले पाहिजे. या वातावरणामुळे लोकांमधील माणुसकी जागी झालीय, हा आपला लाभ आहे. सगळ्यांशी आनंदाने वागा, असेही भुर्के यांनी सांगितले.

दिवाळी अंकाविषयी बोलताना 'चपराक' हा सध्याचा सर्वात मोठा व जास्त खपाचा अंक असल्याचे प्राचार्य भुर्के यांनी नमूद केले. यावेळी दिवाळी अंक स्पर्धेचा प्रथम पुरस्कार 'चपराक' दिवाळी अंकाला देण्यात आला. 'अपेक्षा'ला द्वितीय, 'वेदांतश्री'ला तृतीय तर 'अष्टपैलू' या दिवाळी अंकाला चतुर्थ पुरस्काराने गौरविण्यात आले.

रूद्र एन्व्हायर्मेंटल सोल्युशन इंडिया लिमिटेडच्या डॉ. मेधा ताडपत्रीकर, अभिनेत्री सुस्मिता भंडारी, पंडित रामदास पळसुले, सुप्रसिद्ध गायिका सुवर्णा माटेगावकर, सुत्रसंचालिका प्रा. नीला कदम यांना सुखकर्ता पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, मंजिरी जोशी, विजय बोत्रे-पाटील यांना साहित्य संवर्धन पुरस्कार, संजय पोमण, रवींद्र देवधर, प्राची धरमासी, माधुरी ठोंबरे, गुन्हे शाखेच्या समाजिक सुरक्षा विभागाचे गणेश जगताप, डॉ. मीना भांगरे, माधुरी कान्हेरे, डॉ. बाळकृष्ण पत्की, शैला मोळक, राजेंद्र जाधव, स्नेहा भगत, सुरेखा फडके, श्रुती बोरांडे यांना कलाउपासक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वर्षा वेलणकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

# श्री दत्तगुरू महात्म्य

**गुरूदत्त पाहिले कृष्णातीरी...**
**जय जय दत्तराज माऊली...**
**दत्त गुरूंना स्मरा...**
**दत्तगुरू सुखधाम माझा...**
**दत्त दिगंबर दैवत माझे...**
**दत्तराज पाहुनी आज...**
**दत्त दिगंबरा या हो...**
**दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ...**
**धन्य धन्य हो प्रदक्षिणा...**
**मज भेटुनी जा हो दत्तसख्या...**
**माझी देवपूजा पाय तुझे गुरूराया...**

वरीलपैकी किंवा इतर कोणतेही श्री. आर. एन. पराडकर यांचं गाणं ऐकलं की गुरूवार असल्याचा भास होतो. ही गाणी वाचतानासुद्धा आपण मनात गुणगुणायला लागतो. आर. एन. पराडकर यांचा लोभस आवाज. गुळाच्या गोडीसारखा गोड, मुलायम! एखादा चॉकलेटचा तुकडा खाऊन संपल्यावर त्याची चव, गोडी आपल्या जीभेवर रेंगाळत राहते, पुन्हा चॉकलेट खावेसे वाटते, अगदी तसा. तशीच ही गाणी, भक्तीगीते पुन्हा पुन्हा ऐकावीशी वाटतात. असे हे दत्तभक्त आर. एन. पराडकर. गाणं लागलं की, आपण कुठेतरी दत्तमंदिरात आहोत असंच वाटतं!

श्री दत्तात्रेय, दत्तगुरू, दत्तराज, दत्त दिगंबर, सद्गुरू, दत्तसखा, दत्त असा नामोल्लेख असणारे हे दत्त महाराज हिंदू धर्माप्रमाणे ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे अवतार मानले जातात. त्यांना 'त्रिमूर्ती' असेही म्हटले जाते. दत्ताच्या आरतीमध्ये जसा उल्लेख आहे.

**''त्रिगुणात्मक त्रैमुर्ती दत्त हा जाणा**
**त्रिगुणी अवतार, त्रैलोक्य राणा...''**

या संदर्भातील एक अख्यायिका सुप्रसिद्ध आहे.

ब्रम्हदेवांचे पुत्र, अत्री. म्हणजे आपण ज्यांना अत्रीऋषी म्हणून ओळखतो ते. अत्रीऋषींचा विवाह देवी अनसूया यांच्याबरोबर झाला. देवी अनसूया या कर्दम ऋषी यांच्या कन्या.

अत्रीऋषींची मनापासून इच्छा होती की तिन्ही लोकांचे देवश्रेष्ठ ब्रम्हा, विष्णू व महेश यांनी अत्रीऋषींच्या घरी जन्म घ्यावा आणि या बालकाने जगाचा उद्धार करावा!

ही इच्छा मनात धरुन अत्रीऋषींनी कठीण तप सुरु केले. या तपामुळे देवांचे देव इंद्रदेव हे प्रभावित झाले. त्यांनी ब्रह्मा, विष्णू व महेश यांना पाचारण केले. समस्या सांगितली. ब्रम्हा, विष्णू व महेश यांनी इंद्रदेवांची आज्ञा प्रमाण मानून अत्रीऋषींचा आश्रम गाठला.

हे तिघे आश्रमात पोहचले तेव्हा अत्रीऋषी ध्यानमग्न आवस्थेत होते. त्यांना जागृतावस्थेत आणण्यासाठी सर्व ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रयींनी सूक्ष्मरूप धारण करून अत्रिऋषींच्या हृदयात प्रवेश केला. अत्रीऋषी जागृतावस्थेत आल्यानंतर या तीन देवश्रेष्ठींनी अत्रीऋषींना वर मागायला सांगितला. अत्रीऋषी म्हणाले,

''देवश्रेष्ठ हो, मला आपण, आपल्या सारखा समर्थ पुत्र द्यावा, जो त्रैलोक्याचे कल्याण करेल.''

''तथास्तु'' असा आशीर्वाद देऊन सर्व ब्रम्हा, विष्णू व महेश अंतर्धान पावले.

त्यानंतर देवश्रेष्ठांच्या कृपेने देवी अनसूयाच्या तळहातावर तीन फोड आले. हे तिनही फोड तेजपूंज होते.

देवी अनसूयेने एकदा सुईसारख्या टोकदार वस्तूने हे फोड फोडले. तेव्हा ती आश्चर्यचकित झाली. त्या प्रत्येक फोडातून एक-एक सुंदर बालक जन्माला आले.

अत्रीऋषी व देवी अनसूया ही तीन सुंदर बालके पाहून आनंदून गेले. अत्रीऋषींचे तप पूर्ण होऊन देव प्रसन्न झाल्याचीच ती अनुभूती होती!



अत्रीऋषींनी अनसूयेला सांगितले,''देवी अनसूया, आपल्या घरी सर्व ब्रम्हा, विष्णू व महेश जन्माला आले आहेत. या बाळांचे तुम्ही यथा योग्य पालन-पोषण करा.''

पहिले बालक जे शंकराचा अंश होते त्याचे नाव 'दुर्वास'. दुर्वासमुनी शंकराप्रमाणे शीघ्रकोपी झाले. ब्रह्माजींचा अंश असलेले दुसरे बाळ 'सोम' अर्थात चंद्र, चंद्राप्रमाणेच शीतल, शांत असे होते. तिसरे बाळ जे विष्णूंचा अंश होते, याचे नाव 'दत्तात्रेय'. या बाळाला जन्म-मृत्युची बाधा नव्हती. यांची जो सेवा करेल त्याची जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून सुटका होईल!

श्रीदत्तात्रेयांनी गिरनार पर्वतावर राहून तपश्चर्या केली. त्यामुळे गिरनार हे भाविकांसाठी पवित्र स्थान, तीर्थक्षेत्र बनले. गिरनार येथे वास्तव्यास असणाऱ्या साधुंना श्रीदत्तात्रेय कोणत्या ना कोणत्या रुपात दर्शन देतात; अशी मान्यता आहे. गिरनाराला पौर्णिमेचे दर्शन महात्म्य आहे.

श्रीदत्तात्रेयांचे आपण जेव्हा चित्र रेखाटतो तेव्हा गळ्यात रुद्राक्षमाळा, अंगावर भस्माचे पट्टे आणि समोर चार कुत्री दिसतात. हे चार वेद. रुद्राक्ष, अंगावरील भस्म यामुळे तो स्माशानातील शिवाचे ध्यान करत असल्याचे दिसते. मार्कंडेय पुराणात सतराव्या अठराव्या अध्यायात दत्तात्रेयांचा उल्लेख आहे.

श्रीदत्तमहाराजांचा उल्लेख त्यांचे साधक परंपरेने 'गुरुदेव' असा करतात. श्रीदत्तात्रेयांचे पिता असलेले अत्रीऋषींनी वेदातील, पाचव्या मंडळातील ऋचांचे लेखन व संकलन केले होते आणि माता अनसूया ही सांख्यतत्त्वज्ञानी कपिल मुनींची बहीण. पुराणात वर्णन असलेले दत्तशिष्य म्हणजे यदु, आयु, अलर्क, सहस्त्रार्जुन व परशुराम. सांकृती हा दत्तशिष्य एक महामुनी होता. याचा उल्लेख उपनिषदात आहे.

एक महान योगी म्हणून श्रीदत्तात्रेयांस नाथ महानुभव पंथ, लीलाचरित्र, दत्तसंप्रदाय, तांत्रिक इत्यादी संप्रदयातील साधक उपास्य दैवत मानतात. महानुभाव संप्रदयाचे प्रवर्तक श्री चक्रधरस्वामी श्रीदत्तात्रेयांना पुज्य मानतात. श्री. चांगदेव राऊळ यांना इ. स. अकराशेच्या सुमारास दत्तदर्शन झाले असा लिखित उल्लेख आहे.

श्रीदत्तात्रेय वारकऱ्यांनाही पूज्य आहेत. संत ज्ञानदेव आणि संत एकनाथ हे श्रेष्ठ दत्तोपासक होते. मुसलमान या देवतेचा निर्देश 'शाहा फकीर' असा करतात. भक्तांसाठी दत्तप्रभू मलंगवेश धारण करतात; अशी धारणा आहे. यामुळेच दत्तात्रेयांचे अनेक भक्त मुसलमान असतात. नागा साधुंच्या सहा मुख्य आखाड्यांपैकी भैरव आखाड्याची देवता 'दत्तात्रेय' आहे.

श्रीदत्तात्रेयांची उपासना दत्तांना गरू मानून केली जाते. उपासनेत पादुकांना प्राधान्य दिले जाते.

औदुंबर, कडगंची, कर्दळीवन, कारंजा, कुखपूर, गरुडेश्वर, गाणगापूर, गिरनार, नरसोबाची वाडी, नारेश्वर, पीठापूर, बसव कल्याण, बाळेकुंद्री, माणगाव, माहूर, अक्कलकोट, आंबेजोगाई, अष्टे, कोल्हापूर, खामगाव, चौल, फलटण, माणिकनगर, विजापूर, सांखळी इत्यादी संपूर्ण भारतभर पसरलेली, अनेक राज्य व्यापलेली श्रीदत्तात्रेयांची तीर्थश्रेत्रे मानली जातात.

श्री. श्रीपादवल्लभ आणि श्री. नृसिंह सरस्वती या शिष्यद्वयांनी दत्त संप्रदयाचे पुनरूज्जीवन केले. तत्कालीन मुसलमानांच्या आक्रमणापासून जनजागृती करुन हिंदू धर्माचे रक्षण केले, असे मानतात.

श्रीदत्तगुरुंनी लिहिलेली 'दत्तसंहिता' परशुरामांनी त्यावर आधारित लिहिलेले 'परशुराम कल्पसुत्र' सुमेधाने लिहिलेले 'त्रिपुरारहस्य', 'अवधूतगीता', 'दत्तात्रेय उपनिषदे', गोरक्षनाथांनी लिहिलेली 'गोरखबानी', महानुभावांचा 'सातीग्रंथ' त्यातील 'उद्धवगीता' दत्तमहिमा गाण्यासाठी लिहिलेला 'सैदाद्रवर्णन', गुरूगीता कवडी बुवांचा 'दत्तप्रबोध' इत्यादी ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

दासबोधाच्या रचनेसाठी रामदास स्वामींनी दत्तप्रणीत अवधूतगीतेचा आणि गुरूगीतेचा उपयोग केलेला अढळतो.

असे हे गुरुमहात्म्य आपल्या सर्वांचे जीवन सन्मार्गी लावण्यासाठी मार्गदर्शक व्हावे हीच श्रीगुरूचरणी प्रार्थना!

दासगणू महाराजांनी 'श्री गजानन विजय' नावाच्या ग्रंथामध्ये गुरूचे फार सुंदर वर्णन केले आहे.

**।। गुरू असावा महाज्ञानी**
**चातुर्यशास्त्र चिंतामणी**
**गुरू असावा परमगुणी**
**भक्ती पंथाचे दाविता ।।**
**''दिगंबरा, दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा''**

■ **जयंत कुलकर्णी**
तपोवन सोसायटी, वारजे, पुणे

**नम्र आवाहन**

**सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या 'चपराक'चे सभासद आपणही अवश्य व्हा!**

**वार्षिक वर्गणी** ▶ **साप्ताहिक : २०० रु.** **मासिक : ५०० रु.**

**आमच्या www.chaprak.com या वेबसाईटवरून ऑनलाईन पैसे भरूनही आपणास सभासद होता येईल.**

सभासद होण्यासाठी आणि वर्गणीचे नुतनीकरण करण्यासाठी संपर्क : **तुषार उथळे पाटील**

**दूरध्वनी : ०२०-२४४६०९०९, ९५५२८५८१००**



# 'नागपूर अधिवेशन' सिनेमागृहात

**दरवर्षी** भरणारे नागपूर अधिवेशन एक सरकारी सहलच झाली आहे. या काळात एक वेगळेच नागपूर विधानभवनाबाहेर पहायला मिळते. राज्याचे विषय, त्यांच्या समस्या घेऊन तिकडे विधानसभेत अथवा विधान परिषदेत बोलणारी राजकारणी मंडळी, त्यांच्या पक्षांचे कार्यकर्ते, मोर्चे घेऊन येणारी मंडळी, अनेक आमदार-कार्यकर्ते मंडळी यांची स्वतःची स्वतंत्रपणे मोर्चेबांधणी सुरू असते. यावेळी घडणाऱ्या गमतीजमती एरवी कुठेच पहायला मिळत नाहीत. ऐन थंडीत अधिवेशनाला जाण्याचा नेते मंडळींचा उत्साह व पिकनिक मूडमध्ये सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे डोळेझाक करण्याची प्रवृत्ती जास्तच बळावत चालली आहे. याचेच मार्मिक चित्रण अनिल केशवराव जळमकर निर्मित 'नागपूर अधिवेशन एक सहल..' या मराठी चित्रपटातून पहायला मिळणार आहे. निलेश रावसाहेब जळमकर लिखित-दिग्दर्शित हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे.

विदर्भ पिक्चर्स प्रस्तुत 'नागपूर अधिवेशन एक सहल..' चित्रपटातून या अधिवेशनाची एक वेगळी बाजू मांडण्याचा प्रयत्न दिग्दर्शकाने केला आहे. राजकारणापलीकडचे राजकीय रंग या हिवाळी अधिवेशनात पहायला मिळतात. अधिवेशनादरम्यान रंगणारा गप्पांचा राजकीय फड असो की राजकारण्यांची स्टाईल हे सगळंच या काळात खूप लक्षवेधी असतं. मंत्र्यांच्या सरबराईत इथला सरकारी कर्मचारी कसा त्रासून जातो आणि शेवटी करोडो रुपये खर्च करून पार पडणाऱ्या अधिवेशनात अनेक प्रश्न अनुत्तरीतच राहतात. अशा अनेक बाबींवर या चित्रपटातून नेमकं भाष्य करण्यात आलंय. या चित्रपटाची सह-निर्मिती ययाती नाईक यांनी केली आहे.

मकरंद अनासपुरे, अजिंक्य देव, मोहन जोशी, भारत गणेशपुरे या कलाकारांसह विनीत भोंडे, चेतन दळवी, अमोल ताले, संकर्षण कऱ्हाडे, दिपाली जगताप, स्नेहा चव्हाण आदी कलाकारांनी भूमिका साकारल्या आहेत. गीतकार अनंत खेळकर, निलेश रावसाहेब जळमकर, अमोल ताले लिखित गीतांना अमित ताले यांनी संगीतबद्ध केलं आहे. पार्श्वसंगीताची साथ अमेय नारे, साजन पटेल यांनी दिली असून प्रसन्नजीत कोसंबी, बेला शेंडे, ऋषिकेश रानडे, शरद ताऊर यांच्या आवाजात ही गीते स्वरबद्ध झाली आहेत. वेशभूषा संदीप जोशी, रंगभूषा निशिकांत उजवणे यांची तर छायांकन चंद्रकांत मेहेर यांनी केलंय. कार्यकारी निर्मात्याची जबाबदारी योगेश जाधव यांनी सांभाळली आहे.

# 'ब्रेव्हहार्ट' थर्ड आय एशियन फिल्म फेस्टीवलमध्ये

**मराठी** चित्रपटसृष्टीत अनेक नाविन्यपूर्ण विषयांवर चित्रपटांची निर्मिती होतेय. याच पार्श्वभूमीवर बंगाली भाषिक अनुभवी दिग्दर्शक दासबाबू 'ब्रेव्हहार्ट जिद्द जगण्याची' हा सत्यघटनेवर आधारित मराठी चित्रपट घेऊन येताहेत. 'निखिल फिल्म्स'ची प्रस्तुती असलेल्या 'ब्रेव्हहार्ट' चित्रपटाची १५ व्या थर्ड आय आशियायी चित्रपट महोत्सवातील मराठी चित्रपट विभागात निवड करण्यात आली आहे. मुंबईत येत्या १५ डिसेंबर ते २२ डिसेंबर या कालावधीत हा महोत्सव होणार आहे.



दिग्दर्शक दासबाबू यांनी याआधी 'लढा', 'श्रीमंताची लेक', 'हे बंध रेशमाचे', 'एक धागा सुखाचा' यासारख्या अनेक मराठी मालिकांसोबत 'तहान' या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. त्यांच्या 'ब्रेव्हहार्ट' चित्रपटात एका मुलाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीची आणि जिद्दीची कहाणी आपल्यासमोर येणार आहे. निर्माते सच्चिदानंद गोपीनाथ कारखानीस व संतोष यशवंत मोकाशी यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाची पटकथा-संवाद व गीते श्रीकांत बोजेवार यांनी लिहिली असून अर्नब चटर्जी यांनी संगीत दिलंय. पार्श्वसंगीत अमर मोहिले यांनी दिलं असून चित्रपटाच्या कार्यकारी निर्मात्याची जबाबदारी प्रशांत शामराव पवार सांभाळीत आहेत.

संग्राम समेळ व धनश्री काडगावकर या युवा जोडीसह अरुण नलावडे, अतुल परचुरे, सुलभा देशपांडे, किशोर प्रधान, डॉ. विलास उजवणे, विजय चव्हाण, इला भाटे, अभय कुलकर्णी, शमा निनावे, कु. अथर्व तळवेलकर, स्वामीकुमार बाणावलीकर यांच्या भूमिका या चित्रपटात आहेत.



# 'स्वामी तिन्ही जगाचा : भिकारी' चित्रपटाचा मुहूर्त

## ■ नृत्यदिग्दर्शक गणेश आचार्य आता करणार दिग्दर्शन ■

**ठेका** धरायला लावणाऱ्या गाण्यावर उत्तम नृत्यदिग्दर्शन करून त्याच गाण्यात स्वतःही नृत्य करणारे गणेश आचार्य यांचे नाव 'बॉलिवूड'मध्ये चांगलेच प्रसिद्ध आहे. हिंदी मराठीतील गाजलेल्या अनेक गाण्यांचे नृत्यदिग्दर्शन केल्यानंतर गणेश आचार्य आता मराठीत चित्रपटाचं दिग्दर्शनही करणार आहेत. 'स्वामी तिन्ही जगाचा : भिकारी' असं या चित्रपटाचं नाव असून, चित्रपटात उत्तम स्टारकास्ट पहायला मिळणार आहे.

गणेश आचार्य हे नाव चित्रपटप्रेमींच्या चांगलं परियचाचं आहे. त्यांचं नृत्यदिग्दर्शन असलेली 'चिकनी चमेली...' सारखी अनेक गाणी प्रचंड गाजली आहे. त्याशिवाय स्वामी (२००७) , मनी है तो हनी है (२००८) आणि एंजल (२०११) या हिंदी चित्रपटांचं दिग्दर्शनही त्यांनी केलं आहे. अलहकडे मराठी चित्रपटातील गाजलेल्या 'आला होळीचा सण लय भारी', 'तुझी चिमणी उडाली भूर्रर्र', 'डॅशिंग गोविंदा' अशा गाण्यांचे त्यांनी नृत्यदिग्दर्शन केले आहे. मराठी चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शन करतानाच आता ते मराठीत दिग्दर्शकीय इनिंगही सुरू करत आहेत. अनेक वर्षापासून मित्र असलेले गणेश आचार्य आणि शरद देवराम शेलार यांनी 'मी मराठा फिल्म प्रोडक्शन'ची स्थापना करून चित्रपट निर्मितीमध्ये प्रथम पाऊल टाकले आहे.

'स्वामी तिन्ही जगाचा : भिकारी' हा चित्रपट आई आणि मुलाच्या हळव्या नात्यावर बेतला आहे. स्टार अभिनेता स्वप्नील जोशी, रूचा इनामदार, गुरू ठाकूर, सयाजी शिंदे, मिलिंद शिंदे, कीर्ती आडारकर, सुनील पाल आणि प्रदीप काब्रा अशी तगडी स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे.

'गेल्या काही वर्षांत मराठी चित्रपटानं स्वतःचा ठसा उमटवला आहे. उत्तम आशय आणि व्यावसायिक यश या दोन्हीचा मिलाफ मराठी चित्रपटांत होत आहे. मराठीत काम करताना सकस आशय ही मराठी चित्रपटांची ताकद असल्याचं लक्षात आलं. त्यामुळे मला स्वतःला बरीच वर्षं मराठी चित्रपट दिग्दर्शित करायचा होता. ती इच्छा या चित्रपटाच्या निमित्तानं पूर्ण होत आहे. वेगळं कथानक आणि उत्तम स्टारकास्ट हे चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे. हा चित्रपट मराठी चित्रपटरसिकांना नक्कीच आवडेल,' असं गणेश आचार्य यांनी सांगितलं.

गणेश आचार्य दिग्दर्शित 'स्वामी तिन्ही जगाचा : भिकारी' या मराठी चित्रपटाचा मुहूर्त बिग बी अमिताभ बच्चन आणि हँडसम हंक टायगर श्रॉफ यांच्या उपस्थितीत करण्यात आला. मराठी चित्रपटाच्या मुहूर्ताला बिग बींनी उपस्थित राहण्याची बहुधा ही पहिलीच वेळ आहे. मुहूर्तावेळी बिग बी आणि टायगर श्रॉफ यांनी गणेश आचार्य यांना चित्रपटासाठी शुभेच्छा दिल्या.

# आपला माणूस, आपला नेता



६ जनपथ, नवी दिल्ली. हे मोठा दबदबा असणारं ठिकाण. हे दबदबा असणारं ठिकाण म्हणजे एक प्रशस्त बंगला. मात्र या बंगल्याचा दबदबा वाढला तो या बंगल्यात राहणाऱ्या व्यक्तिमुळे आणि ही व्यक्ती म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणावर मोठा प्रभाव असणारे, आपल्या कुशल राजनीतिने विरोधकांची झोप उडविणारे आणि तरीही विरोधकांशी मैत्रीपूर्ण संबंध जोपासणारे, शेतकऱ्यांच्या हितासाठी सतत झटणारे आणि अशा अनेक गुणातून जाणता राजा म्हणून लौकिक प्राप्त झालेले महाराष्ट्राचे सुपुत्र शरद पवार. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री, कृषिमंत्री अशी त्यांची मोठी ख्याती जरी असली तरी महाराष्ट्राच्या दुर्गमातल्या दुर्गम भागातही केवळ साहेब म्हटलं तरी डोळ्यासमोर उभे राहतात ते शरद पवार. अशी मोठी व्यक्ती जिथं राहते त्या ६ जनपथचा दबदबा वाढला नसेल तरच नवल!

शरद पवार केवळ राजकारणातच दीर्घकाळ सत्तेत राहिले, म्हणून नव्हे किंवा त्यांनी राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात मोठी मोठी मंत्रिपदं भूषवली म्हणून केवळ ते मोठे ठरत नाहीत, ती तर आजपर्यंत अनेकांनी भूषवली आहेत. ते मोठे झाले ते जनतेमुळे, जनतेशी त्यांच्या व्यवहारामुळे. महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचलेलं हे नाव आपलं नातं थेट इथल्या जनतेशी सांगतं. अगदी एखाद्या अडवळणी खेड्यातील आपल्या कार्यकर्त्याला त्याच्या नावानिशी ते ओळखतात. त्याच्या खांद्यावर हात ठेवून चालत राहणारा हा नेता त्या कार्यकर्त्याबरोबरच त्या गावाचाही आधार होतो. कार्यकर्त्याच्या हृदयात आपलं स्थान निर्माण करण्याची पवारसाहेबांची ही कला फार कमी कार्यकर्त्यांना अवगत आहे. पवारसाहेब मोठे झाले ते खेड्यातील अशा कार्यकर्त्याला जीव लावून आणि मग त्या कार्यकर्त्याच्या गावातील समस्या सोडवता सोडवता राज्याच्या आणि देशाच्या समस्या सोडवू लागले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर असताना देशाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता तेव्हा दिल्लीतून हाक आल्याबरोबर त्यांनी मुख्यमंत्री पद सोडून देशाच्या संरक्षणमंत्री पदाची धुरा सांभाळली. असं आपलं सगळं आयुष्य देशसेवेसाठी वेचणाऱ्या या मोठ्या नेत्याच्या वाढदिवसादिवशी मला लाभलेल्या त्यांच्या एका दीर्घ भेटीची आठवण झाली. योगायोगाने ती भेट ही ६ जनपथ, नवी दिल्ली या त्यांच्या बंगल्यावरचीच. हा नेता मोठा का? याचं आणखी एक गुपित मला त्यांच्या या भेटीत कळलं आणि ही भेट माझ्या मनात अगदी घर करून राहिली. या भेटीतच दिल्लीसारख्या ठिकाणी शरद पवार आम्हाला आपला माणूस वाटले आणि आपला नेताही. तिथं त्यांची जितकी जवळून भेट मिळाली तितकी या अगोदर महाराष्ट्रातही कधी मिळाली नव्हती. त्यामुळेच या दीर्घ भेटीत शरद पवार दिल्लीसारख्या ठिकाणी खूप जवळचे वाटले.

काही दिवसांपूर्वी मी माझ्या काही पत्रकार मित्रांसह संसद अभ्यास दौऱ्यानिमित्त आठ दिवस दिल्लीमध्ये होतो. या काळात महाराष्ट्रातल्या अनेक खासदारांना त्यांच्या घरी जाऊन भेटण्याचा योग आला. ६ जनपथमध्ये मात्र एकाचवेळी दोन खासदार भेटले. शरद पवार साहेबांबरोबरच त्यांच्या सुकन्या, बारामतीच्या खासदार सुप्रियाताई सुळेही इथंच भेटल्या. इथं पवारसाहेबांच्या वेगळ्या गुणांचं मला दर्शन झालं ते म्हणजे त्यांचं वेळेचं महत्त्व. त्यांनी आम्हाला संध्याकाळी साडेपाच वाजता भेटण्याची वेळ दिली होती. त्यांच्या वेळ पाळण्याच्या नियमाविषयी आम्ही ऐकून होतो, त्यामुळे आम्ही सव्वापाचलाच ६ जनपथसमोर पोहोचलो. हा एक प्रशस्त बंगला, जुन्या बांधणीचा. गेट उघडल्यावर आम्ही एका रुंद रस्त्याने आत गेलो. बंगल्यासमोर एक मोठी बाग. ती बाग आणि बंगल्याकडे बघतच आम्ही कार्यालयसमोर पोहोचलो तेव्हा कार्यालयातील एका व्यक्तिने आम्हाला शेजारच्या एका खोलीत बसवलं.

'साहेब अगोदर वेळ दिलेल्या एका व्यक्तिबरोबर बोलत आहेत. तुम्ही बसा, त्यांनी सांगितलं की तुम्हाला बोलावतो,' असं सांगून ती व्यक्ती पुन्हा कार्यालयाच्या दिशेने गेली. आम्ही शांत. शेजारच्या खोलीतून पवारसाहेब कोणाशी तरी बोलतानाचा आवाज येत होता. बोलणं मराठीतून आणि साखर कारखान्यासंबंधी चालू होतं. त्यावरून कोणीतरी महाराष्ट्रातलंच असावं असा आम्ही अंदाज केला. त्यामुळे आता किती वेळ बसावं लागतंय, असा विचार मनात आला, मात्र शेजारच्या खोलीतलं बोलणं थाबलं आणि पवारसाहेब आमच्यासमोर येऊन बसले. मी घड्याळात पाहिलं. बरोबर साडेपाच वाजले होते. एवढा मोठा माणूस महाराष्ट्रातून आपल्याला कोणीतरी भेटायला आलंय, जे त्यांच्या ओळखीचेही नाही. अशा व्यक्तिसांठी आपल्या व्यस्त वेळेतून त्यांना दिलेल्या वेळेत त्यांच्यासमोर येऊन बसणारे पवारसाहेब त्याक्षणी एक माणूस म्हणून मला फार मोठे वाटले. ओळख झाली आणि मग सुरू झाल्या गप्पा. एकदा गप्पा सुरू झाल्यावर त्यांनी आम्हाला दिलेली दहा मिनिटांची वेळ कधी संपली आणि दोन अडीच तास कधी संपले ते कोणालाच कळलं नाही. या गप्पांमध्येही किती वैविध्य होतं. महाराष्ट्र, मराठी माणूस, महाराष्ट्रातलं राजकारण, देशातलं राजकारण, शेतकरी, कामगार, गावखेडं, तिथला कार्यकर्ता, त्याच्या समस्या... कितीतरी विषय; मात्र या सगळ्या विषयांवर ते आत्मियतेने बोलत होते.

खेड्यापाड्यात राहणाऱ्या आपल्या कार्यकर्त्यांची नावं आपल्या लक्षात कशी राहतात? या माझ्या प्रश्नावर ते हसले. म्हणाले,

''सगळ्या कार्यकर्त्यांना मी ओळखतो असं नाही, मात्र सहकारी सोसायटी, दूध संघ, मार्केट कमिटी अशा महत्त्वाच्या संस्थांच्या अध्यक्षांची नावं लक्षात राहतात. या संस्थांचे अध्यक्ष, महत्त्वाचे कार्यकर्ते मी दिसताच त्यांचं नाव घेतलं की ते खूश होतात. त्यांच्या पाठीवर हात ठेवला की त्यांना कामाला बळ मिळतं. या अध्यक्षांच्या, कार्यकर्त्यांच्या भवितव्याचा विचार मी करतो आणि ते त्यांच्या कार्यकर्त्यांच्या भवितव्याचा विचार करतात... आता मात्र पूर्वीसारखं फार राहिलं नाही. आता राजकारणात नवी पिढी आली आहे. या पिढीतल्या कार्यकर्त्यांची ओळख आता हा अमक्याचा मुलगा, हा तमक्याचा मुलगा अशीच करून घ्यावी लागते. नावं लक्षात ठेवण्यासाठी मी फार काही वेगळं करत नाही.

अशा गप्पा सुरू असतानाच तिथं खासदार सुप्रियाताई सुळे आल्या. तेव्हा संध्याकाळचे साडेसहा वाजले होते. संसदेचं कामकाज आज लांबलं होतं. दुपारी बारा वाजता आम्ही लोकसभेचे कामकाज पाहण्यासाठी सभागृहातल्या गॅलरीत बसलो होतो. तेव्हा खासदार किरीट सोमय्या यांनी माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम् आणि त्यांच्या मुलांच्या व्यवहाराविषयी काही प्रश्न उपस्थित केले होते आणि त्यावरून लोकसभेत खडाजंगी सुरू होती. तेव्हा आवश्यकता नसताना सोमय्यांनी सुप्रियाताईंचं नाव कुठल्यातरी संदर्भात घेतलं. असं एखाद्या खासदाराचं नाव घेणं हा औचित्यभंग होता, त्यामुळे सुप्रियाताई आक्रमक झाल्या. इतर खासदारांचीही सुप्रियाताईंना साथ मिळत होती. एमआयएमचे खासदार ओवेसीही सुप्रियाताईंचं नाव का घेतलं म्हणून आक्रमक झालेले दिसले. संसदेच्या कामकाजाचे काही नियम असतात. असं विनाकारण कोणाही खासदाराचं नाव घ्यायाचं नसतं आणि हे नियम सर्व खासदारानां माहीत असूनही सनसनाटी निर्माण करण्यासाठी आणि आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी काही खासदार नियम भंग करताना आपण अनेकदा पाहतो. लोकसभेतील त्या दिवशीचं कामकाज असं आक्रमकपणे सुरू असतानाच आम्हाला वाटलं होतं की आज लोकसभेचं कामकाज लांबणार आणि झालंही तसंच. आज सुप्रियाताई लांबलेलं लोकसभेचं कामकाज संपल्यानंतर संध्याकाळी साडेसहा वाजता घरी आल्या होत्या. महाराष्ट्रातून, विशेषतः पुण्यातून काही पत्रकार पवारसाहेबांना भेटायला आले आहेत म्हटल्यावर त्या थेट आमच्यामध्येच येऊन बसल्या आणि गप्पांमध्ये सहभागी झाल्या. पवारसाहेबांनी आमच्या सगळ्यांची ओळख करून घेतली होती, पण सुप्रियाताईंनीही आस्थेने सर्वांचं नाव, गाव विचारलं. तुम्ही कोणाकोणाला भेटलात?

त्यांच्या प्रश्नावर आम्ही महाराष्ट्रातील काही खासदारांची नावं सांगितली. तेव्हा त्या म्हणाल्या,

''त्यांना तर भेटाच, मात्र एवढ्या लांब येऊन त्यात फार वेळ घालवू नका. आम्ही महाराष्ट्रातले सर्व खासदार तुम्हाला महाराष्ट्रात भेटू शकतो. दिल्लीत आल्यावर इथल्या थिंक टँकला भेटा. देशाचा कारभार कसा चालतो हे समजून घ्यायचं असेल तर या थिंक टँकला तुम्ही भेटलंच पाहिजे. तुमच्या अभ्यास दौऱ्यात त्याचं नियोजन पाहिजे आणि त्यासाठी तुम्ही वेळही राखीव ठेवला पाहिजे... तुम्ही या अभ्यास दौऱ्यावर येणार आहात हे जर मला अगोदर सांगितलं असतं, तर मी त्याचं नियोजन केलं असतं. अशा काही थिंक टँकबरोबर मी तुमची भेट घडवून आणली असती... आता पुढच्या वेळी आलात की मला अगोदर सांगा, तुम्हाला दिल्लीत येऊन अशा काही चांगल्या गोष्टी पहायला, ऐकायला मिळतील आणि तुमचा अभ्यास दौरा खऱ्या अर्थाने अभ्यासपूर्ण होईल याचा मी प्रयत्न करीन.''

असं सांगत त्यांनी लगेच आपल्या पीएचा मोबाईल नंबर आम्हाला दिला आणि महाराष्ट्रातल्या कुठल्याही कामासाठी मला फोन करा म्हणाल्या.

राज्याच्या, देशाच्या अशा गप्पा सुरू असताना पवारसाहेब सुप्रियाताईंकडून आज लोकसभेत काय झालं याची माहिती घेत होते. सुप्रियाताईही सगळं सांगत होत्या. तेव्हा ओघानेच सोमय्यांनी घेतलेल्या त्यांच्या नावाचा विषय निघाला, त्यावेळी संसदेच्या कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या पवारसाहेबांनीही त्या औचित्यभंगाविषयी आपलं मत सांगितलं. पवारसाहेब सुप्रियाताईंकडे संसदेच्या कामकाजाची अशी चौकशी करत असताना मला तो बाप-लेकीतला संवाद फारच महत्त्वाचा वाटला. मी बाप-लेकीतले संवाद अनेकदा अनेक ठिकाणी ऐकले आहेत. कुठल्याही कारखान्यातून, शेतावरून, कार्यालयातून आठ-दहा तास काम करून दमून आलेल्या आपल्या लेकीची बाप चौकशी करतो. म्हणजे कारखान्यातून काम करून आलेल्या मुलीला बाप विचारतो,

''आज काम जास्त होतं का? बस मिळाली का वेळेवर? तिकिटाचे सुट्टे पैसे होते का?''

तर शेतात काम करून आलेल्या मुलीकडे बाप शेतातल्या खुरपणी, पेरणी, काढणी... पिकाला पाणी... अशा गोष्टींची विचारपूस करताना मी पाहिलं होतं.

मात्र आज देशाचा कारभार जिथून चालतो त्या संसदेतून आलेल्या आपल्या मुलीकडे एक बाप तिथं घडलेल्या घडामोडीची विचारपूस करत होता आणि मुलगीही अशा कामकाजात मोठा लौकिक असणाऱ्या आपल्या बापाला सगळं मोठ्या आत्मियतेने सांगत होती. ते ऐकून देशाचा कारभार करण्यासाठी आता लेकही मोठी झाली आहे हे पवारसाहेबांना मनातून नक्कीच जाणवत असेल. आम्हाला ते



जाणवत होतं. बाप-लेकीच्या या संवादात पवारसाहेब थोडे हळवे झाल्यासारखेही वाटत होते. आम्ही मात्र बाप-लेकीमधला तो संवाद तटस्थपणे ऐकत होतो, तेव्हा एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवत होती, ती म्हणजे संसदेच्या कामकाजविषयीचा सुप्रियाताईंचा आत्मविश्वास. हा आत्मविश्वास वारसा हक्काने मिळत नाही. त्यासाठी अभ्यास लागतो, तयारी लागते, प्रश्न मांडायचं धाडस लागतं. प्रतिप्रश्नाचं उत्तर देण्याची धमक लागते... सुप्रियाताईंना ज्या पद्धतीने आम्ही त्या दिवशी संसदेत बोलताना पाहिलं त्यावरून त्यांनी हे गुण कष्टाने मिळवलेत याची जाणीव होते.

पवारसांहेबाचा दिल्लीतला दबदबा आणि अनेकांशी मैत्रीपूर्ण संबंधाचा प्रत्यय आम्हाला त्या गप्पांच्या काळात आला. आम्हाला खासदार सीताराम येच्युरींना भेटायचं होतं आणि त्या काळात कन्हैयाकुमारमुळे गाजत आलेल्या जेएनयूला भेट देऊन तिथल्या काही प्राध्यापकांनाही भेटायचं होतं; पण दोघांचीही भेट मिळत नव्हती; मात्र पवारसाहेबांना आम्ही ही गोष्ट सांगताच केवळ दोन फोन करून या दोन्ही ठिकाणच्या आमच्या भेटी त्यांनी पक्क्या केल्या.

गप्पांमध्ये बाहेर अंधार कधी पडला आणि रात्रीचे साडेआठ कधी वाजले ते आम्हाला कळलंच नाही.

एवढा मोठा नेता दोन तास-अडीच तास आमच्याशी गप्पा मारत बसला. पवारसाहेब कार्यकर्त्याला आपलंसं कसं करतात हे सुद्धा या दोन-अडीच तासात पुसटसं कळलं. नेता मोठा झाला की तो कार्यकर्त्याला विसरतो, पण पवारसाहेबांसारखा मोठ्या मनाचा जाणता नेता याला अपवाद आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची ती भेट पुन्हा डोळ्यासमोर उभी राहिली. तिथल्या गप्पा. राजकारण, समाजकारण, बाप-लेकीमधलं हळवं आणि तितकंच प्रगल्भ नातं आणि पवारसाहेबांनी प्रेमाने दिलेला पाहुणचाराचा गोड शिरा कायम लक्षात राहील. त्यांना उदंड, आरोग्यदायी आयुष्य लाभो हीच सदिच्छा!

■ **बबन मिंडे**

एम९/३६८, लक्ष्मीनगर, रमणा गणपतीजवळ, पर्वती, पुणे ४११००९

भ्रमणध्वनी : ९८५०६९८१०२

## ७० एमएमची खुमारी

***टीव्ही*** असो की डीव्हीडी, मूव्ही चॅनल असो की पायरेटेड मूव्ही, दर शुक्रवारच्या पहिल्या शोची अर्थात ७० एमएमची खुमारी प्रेक्षकांच्या मनावर नेहमीच अधिराज्य गाजवणारी! या सिनेमा नावाच्या वेडाचं असं रक्तात भिनणं आपल्यासाठी अनिवार्यच! प्रसिद्ध चित्रपट समीक्षक, लेखक आणि पत्रकार असणाऱ्या श्रीपाद ब्रह्मेंनी सुरुवातीला एक आस्वादक म्हणून, नंतर पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून आणि अखेर एक 'सदर' चालवताना लिहिलेल्या सुमारे ३०७ चित्रपटांची परीक्षणे - तीच उत्कटता, तेच तादात्म्य आणि सातत्य कायम राखणं अजिबात सोपी गोष्ट नाही!

निरनिराळ्या वृत्तपत्रांमधून चित्रपट परीक्षण लिहिणाऱ्या पत्रकार मित्रांच्या हस्ते या अनोख्या पुस्तकाचं प्रकाशन होणं हे जणू एखाद्या चित्रपटाच्या प्रिमिअरला चित्रपटसृष्टीतल्या सगळ्या दिग्गजांनी हजेरी लावण्याइतकं दुर्मिळ आणि म्हणूनच जरा 'हट के '!

या पुस्तकासाठी निवडलेली परीक्षणंही विविध विषयांना स्पर्श करणारी... शीर्षकांमधून श्लेष साधत तर कधी मर्म उकलत, कधी अर्जुनाप्रमाणे थेट माशाच्या डोळ्याचा वेध घेत (उदा. भाग मिल्खा भाग -आपल्या नसानसांतून 'धावणारा' चित्रपट) ही




**फर्स्ट डे फर्स्ट शो**
लेखक : श्रीपाद ब्रह्मे
प्रकाशक : 'चपराक प्रकाशन' पुणे ०२०-२४४६०९०९
पाने : १४४, मूल्य : १००

परीक्षणे आपल्यासमोर येतात. मुळात परीक्षणे लिहिणे हेच मुळी मोठ्या कौशल्याचं काम! वाचणारा उत्सुकतेनं आधी शीर्षक पाहणार तेव्हा त्याच्यासमोर अख्खा चित्रपट - किमान मुख्य झलक तरी तरळायला हवीच... आणि जसजसं ते परीक्षण तो वाचत जाईल तसतशा वाचणाऱ्याच्या मनात त्या त्या प्रतिमा एखाद्या 'स्लाईड शो'प्रमाणे उतरत जायला हव्यात - अर्थात क्लायमॅक्स फुटला तर नाही पाहिजे पण त्याच्याबद्दलच्या उत्सुकतेच्या ठिणग्या वाचकाच्या मनात नक्की फुटायला हव्यात! एक निराळं असं भारावलेपणाचं आणि औत्सुक्याचं विश्व तयार व्हायला हवं वाचकाच्या मनात आणि त्यात तरंगतच वाचकानं आपसूक चित्रपटाच्या टॉकीजचा मार्ग धरायला हवा. ब्रह्मेंचं लेखन या सगळ्या कसोट्यांना तंतोतंत उतरतंच; पण शिवाय ज्या ज्या चित्रपटांच्या अनुषंगानं उभ्या राहणाऱ्या जनरल नॉलेजची भरही वाचकांच्या पदरात टाकतं! शिवाय चित्रपट परीक्षण ही काय नुसती 'गुडी गुडी ' गोग्गोड भाटगिरी करायची गोष्टही नसते, याचाही प्रत्यय श्रीपादच्या परीक्षणांमधून लख्खपणे जाणवतो. 'टाईमपास २' मधली वाईट रीतीनं लोप पावलेली उत्स्फूर्तता, सिनेमाची म्हणून एक भाषा असते. 'कॅमेऱ्यालाही कधीतरी बोलूद्या' म्हणून 'शब्दबंबाळ बोलपट' हे नटसम्राटचं यथार्थ वर्णन, खट्टा-मिठाला उद्देशून डोशाच्या पिठाचं थालिपीठ... या शीर्षकातच सगळं परीक्षण आलं! उलट परीक्षण लिहीत असतानाही चित्रपटानं गाठलेली उंची - तिचं मोजमाप करत असतानाही ब्रह्मेंनी प्रॅक्टिकल ग्राउंड अजिबात सोडलेलं नाहीये. म्हणूनच ही सगळी परीक्षणं अस्सल वाटतात, तुमच्या-आमच्या मनातली वाटतात.

खरंतर तुम्ही आम्ही सगळेच आपापल्या आयुष्यात येनकेन कारणेन परीक्षकाची भूमिका सदैव बजावत असतोच. अगदी चित्रपट पाहिल्या पाहिल्या काही ना काही प्रतिक्रिया प्रत्येकाच्याच मनात उमटते. चित्रपट परीक्षण वाचल्या वाचल्या 'राईट! मलाही हेच म्हणायचे होते अगदी!' अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया देण्याचं काम श्रीपाद ब्रह्मेंचं प्रत्येक परीक्षण चोख बजावतं आणि हेच या पुस्तकाचं मोठं यश आहे असं मला वाटतं!

त्रुटी कोणती असेल तर ती हीच की, हे पुस्तक इतकं छोटं का आहे? आणखी काही चित्रपटांचा समावेश यात का नाहीये, असा प्रश्न पुस्तक संपल्याक्षणी चित्रपट संपल्यावरच्या टायटललिस्ट सारखा उसळी मारून वर येतो! खैर, परिश्रमपूर्वक दस्तावेजीकरण म्हणून संकलित करण्यात आलेल्या या ५० चित्रपट परीक्षणांमुळे, त्या त्या चित्रपटांशी पुनश्च रिलेट होण्याचा अनुभव प्रत्येकाने घ्यावा असाच!

■ **सुप्रिया कुलकर्णी-खोत**

(आमच्या www.chaprak.com या वेबसाईटवरून ऑनलाईन बुकिंग करून हे पुस्तक आपण घरपोच मागवू शकाल.)

# कवच

*निशा* आणि राजेश रात्रंदिवस काबाड कष्ट करत होते. घरात सर्वांना सुख मिळावे. रोहिणी व प्रकाश या आपल्या अपत्यांना काहीच कष्ट करायला लागू नयेत. तोंडातून शब्द निघताच मुलांच्या मागण्या पूर्ण करण्यात आयुष्याची इतिकर्तव्यता... सार्थकता... धन्यता... सारे शब्द कमी पडावेत इतके समाधान वाटायचे. मुलांना सर्व सुख मिळावे त्यांच्या मागण्या लवकर पूर्ण व्हाव्यात म्हणून जिवाचे रान करायचे.

गरिबी म्हणजे अभावाच जीणं. मन मारून जगणं. दोन वेळेच्या जेवणासाठी यातायात, काबाडकष्ट करावे लागतात. अगदी छोट्या छोट्या गरजाही पूर्ण होत नाहीत. हौस-मौज तर दूरची गोष्ट आणि असं जगणं किती त्रासदायक असतं हे असं जो जगतो त्यालाच माहीत. निशा आणि राजेश दोघांनीही गरिबी... अभावाचं जिणं अनुभवलं होतं... भूक त्यांनी अनुभवली होती. दोन वेळेला भूक लागल्यावर पोटभर नाही पण थोडेतरी अन्न मिळणं हीच त्यांच्यासाठी चैन होती. सुखाची परिभाषा होती. बाकी सुख म्हणजे केवळ स्वप्नच! अन्नासाठीच वणवण... त्यासाठी सुंदर ओळी आठवल्या –

**वो राम की खिचडी भी खाता है,**
**रहीम की खीर भी खाता है,**
**वो भूखा है जनाब उसे,**
**कहाँ मजहब समझ आता है।**

हे सारं सारं त्यांनी अनुभवलं होतं आणि आपण गरिबीत पूर्वी दिवस काढले त्याची झळ मुलांना अजिबात लागणार नाही याची पुरेपूर काळजी दोघं घेत होते.

निशा आणि राजेश गरिबीत जन्मले; पण मेहनत करायची तयारी, पडेल ते काम करण्याची जिद्द यामुळे त्यांनी नोकरी करता शिक्षण पूर्ण केले आणि पुन्हा शिक्षणाच्या जोरावर चांगली नोकरी मिळवली. सुखाचे दिवस दिसू लागले आणि म्हणूनच मुलांना सुखच सुख मिळावे, अभाव त्यांना जाणवू नये ह्याची पुरेपूर दक्षता घेत होते.

आईवडिलांचा हेतू मुलांप्रती भावना चांगली आहे. आयतं सगळं मिळणं आणि स्वप्रयत्नानं मिळवणं ह्यात खुप फरक आहे. ऐषोआराम दिला म्हणजे आपण मुलांचं जगणं सोपं नव्हे कधीकधी कठीण करुन ठेवतो. मुलांना 'नाही' ऐकायची सवय राहत नाही आणि सर्व विनासायास सहज उपलब्ध होते त्यामुळे मिळवण्यास काय प्रयास करावे लागतात याची जाणीवही राहत नाही. तसंच आता रोहिणी आणि प्रकाशच्या बाबतीत होऊ लागला. त्यांच्या अवास्तव मागण्याही वाढू लागल्या आणि ह्या पुऱ्या करण्याकरता निशा व राजेशची दमछाक होऊ लागली. आपल्या मुलांना आपल्यासारखं गरिबीचं, अभावाचं जीणं जगावं लागू नये यासाठी प्रयत्न करत राहिलो हे चुकलं तर नाही ना? असं वाटायची वेळ आली.

आणि राजेशच्या वाचनात खूप सुंदर प्रेरक छोटीशी कथा वाचनांत आली आणि त्याचे डोळे खाडकन उघडले.



सुवर्णाक्षरे
सुवर्णा जाधव, मुंबई
९८१९६२६६५७

एक आटपाट नगर होते. तिथं एक राजा होता. राजाला पक्षी पाळण्याचा छंद होता. त्यामुळे त्याने दोन गरुड आणले आणि गरुडांना प्रशिक्षित करण्यासाठी एक प्रशिक्षक नेमला. प्रशिक्षण सुरु झाले. त्यामुळे एक गरुड आकाशात उंच भराऱ्या घेऊ लागला. स्वच्छंद विहार करु लागला. दुसरा गरुड मात्र काहीच हालचाल करेना. तो काही आपली जागा सोडत नव्हता. राजा नाराज झाला. त्याला काळजीही वाटू लागली. म्हणून त्याने दवंडी पिटवली. 'गरुडाला उडवून दाखवणाऱ्यास बक्षिस...।'

दुसऱ्या दिवशी राजा बागेत आला आणि त्याला नकळतच दिसले. जो गरुड आपली जागा सोडत नव्हता तो गरुड पहिल्या उडणाऱ्या गरुडपेक्षा उंच भरारी घेत होता. हवेत गिरक्याही घेत होता राजाला खुप आश्चर्य वाटले व आनंदही झाला. राजाने चौकशी केली. हा चमत्कार कसा घडला? त्यावेळी एक शेतकरी हे करु शकला. म्हणून त्याला बोलवले आणि राजाने विचारले अरे आमचा प्रशिक्षकही त्याला उडवू शकला नाही. तू नेमके केलेस तरी काय? शेतकऱ्याने शांतपणे सांगितले, ''महाराज, मी



विशेष काही केले नाही. मी फक्त गरुड ज्या फांदीवर बसला होता ती फांदी कापली फांदी कापल्याबरोबर गरुड दुसऱ्या क्षणी आकाशात झेपावला आणि आकाशात भरारी घेऊ लागला.''

राजेशने तिच कथा निशाला वाचायला दिली. दोघेही अंर्तमुख झाले आणि त्यांच्या लक्षात आले की आपणसुद्धा आपल्या मुलांना त्या गरुडाप्रमाणे एक सुरक्षित फांदी बसायला दिली आहे. त्यामुळे सुरक्षित फांदी हेच त्यांचे आयुष्य झाले आहे. आपण मुलांना सुखद सुरक्षित कवचच जणू दिले आहे. त्यामुळे तेच जीवन त्यांचे विश्व बनले आहे. धडपडण्याची वृत्ती जागृतच केली नाही. त्यामुळे आयुष्य काय असतं... संकट येतात... त्याचा सामना करावाच लागतो... आयुष्य स्वतःच्या कष्टाने, प्रयत्नाने बनवावे लागते. ही मुख्य शिकवणच आपल्याकडून दिली गेली नाही. प्रयत्नवादी करण्याऐवजी आपण आपल्या मुलांना ऐषोआरामी जीवनशैली आणि त्यामुळे ऐदी मनोवृत्तीच दिली आणि दोघांनीही मुलांना सुरक्षित कवचातून खुल्या आकाशात आणण्याचा निश्चय पक्का केला. आणि हे योग्यच आहे. नाही का?

रामदास स्वामींनी ही म्हटल आहे...

**''खचू नको शोध बाळा तुझा तुच ज्ञानमार्ग**
**कोणतीही दिशा घे पण माणुसकीला जाग''**

# चूक

*एकदा* एक साठ वर्षाची बाई रस्त्याने चालली होती. तिला आवाज ऐकू आला 'तू शंभर वर्ष जगशील' तिने आजूबाजूला पाहिले. कोणीच नव्हते. नक्कीच देव बोलला... ती खूश झाली. डॉक्टरांकडे गेली आणि डोक्यापासून पायाच्या तळव्यापर्यंत नखशिखांत प्लॅस्टीक सर्जरी करून घेतली. ती बाहेर आली आणि ट्रकचा धक्का लागून गेली. स्वर्गात जाताच ती देवाशी भांडायला लागली. ''तू तर म्हणाला होतास मी १०० वर्ष जगेन म्हणून.'' देव म्हणाला, ''चुकलो... मी तुला ओळखलच नाही!'' चुका जिथं देवाकडून होतात मग आपण तर अतिसामान्य माणसं... आपण चुकणारच.

'टू अर इज ह्यूमन' असं इंग्रजीत म्हणतात. चूक करणं मानवाचा धर्म आहे आणि काम करणाऱ्याकडूनच चुका होतात. आपल्याकडून जशा चुका होतात तशा दुसऱ्याकडुनही होत असतील याची कल्पना करावयास हवी.

एखादी लहानशी चूक आयुष्यभर यातना भोगायला लावणारी असू शकते. अपरिपक्व वयात प्रेम करून लग्न केल्यानंतर दहा पंधरा वर्षांनी जेव्हा समजतं की हा जोडीदार आपल्या योग्यतेचा नाही तेव्हा पश्चातापाचा उपयोग नसतो. म्हणूनच म्हणतात आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्यापेक्षाही जी व्यक्ती आपल्या वा प्रेम करते तिच्याशी विवाह होणे फायद्याचे; मात्र प्रेम ह्या भावनेचं हिंदी सिनेमाटाईप विकृतीकरण व्हायला नको. आपल्या आईवडिलांनी शोधलेले आपल्यासाठीचे जोडीदार योग्य. ठरवलेले विवाह म्हणूनच यशस्वी ठरतात. अर्थात चुकभूल देणे घेणे. प्रेमविवाहही यशस्वी होतात.



शब्दतरंग
सदानंद भणगे, नगर
९८१०६२५८८०

आपला विषय समजायला चूक झाल्याने हुशार विद्यार्थ्यांचे नुकसान होते. माणूस ओळखायला चुकल्याने एखाद्या दुर्जन माणसाला आपण सज्जन समजून जवळ करतो आणि तो आपला डाव टाकतो. आपल्यालाच संपवायचा प्रयत्न करतो. उलट एखादा सज्जन मित्र उगाचच दूरावला जातो. आपण त्याला ओळखायला चुकतो. अर्थात ही चूक दुरुस्त होऊ शकते.

एखाद्या बिल्डर्सच्या चुकीमुळे बांधकाम कोसळू शकतात. चुकीचा उपचारमुळे पेशंट दगावू शकतो. चुकीच्या व्यक्तिचा सल्ला घेतल्याने तोटा होऊ शकतो. म्हणूनच कुठलंही काम करताना काय चूक होऊ शकते ह्याची शक्यता बघायला हवी. काम करणाऱ्यांकडून चूक होते. न करणाऱ्यांकडून नाही. आपल्याकडून चूक झाल्यानंतर त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणारे थोडे राहिले. उलट सध्या चूक झाल्यानंतर त्याचं उदात्तीकरण करण्याचे दिवस आहेत. आमच्या जवळचे सदगृहस्थ स्वतःची चूक कधीच कबूल करत नाहीत. काय आज ऑफिसात उशिरा आलात?, असे साहेबांनी विचारल्यावर खरंतर चूक स्वीकारुन सॉरी म्हणवयास हवं. पण ते म्हणतात. त्याचं काय झालं वेळेवर निघालो होतो पण ऐनवेळी कलेक्टर साहेबांचा फोन आला येऊन भेटा. त्यात वेळ गेला. प्रत्यक्षात ह्यांना कलेक्टर ओळखतसुद्धा नसतात. चूक कबूल केल्याने माणसाचा मोठेपणाच सिद्ध होतो. एक चूक लपविण्यासाठी अनेक चुका कराव्या लागतात.

आपल्या लपलेल्या अनेक चुका (खिळा – लहान खिळे या अर्थाने) लावलेल्या असतात. त्यातली एक चूक जरी वर आली तरी ती पायाला टोचते, रक्त काढते. त्या प्रमाणेच एखाद्याची चूक जन्मभर सलत राहते. अर्थात ह्यालाच जीवन ऐसे नाव म्हणतात.

मोठमोठ्या व्यवसायात छोटाशी चूक देखील परवडणारी नसते. लाखो रुपयांचं नुकसान त्यामुळे होऊ शकतं. त्यामुळे जागरूक राहणं महत्त्वाचं असतं. सध्याच्या धकाधकीच्या काळात तर लोक तुमची चूक शोधायलाच बसलेले असतात. थोरांच्या सांगण्याप्रमाणे वागल्यास, संतांच्या उपदेशाप्रमाणे चालल्यास चुका होण्याचा संभव कमी.

काही लोकांना असंख्य चुका कारण्याची सवय असते आणि लगेच क्षमा मागण्याचीही सवय असते हेही योग्य नाही. थोबाडीत मारायची आणि ' सॉरी चुकलो' म्हणायची पद्धत चुकीची. चूक झाल्यानंतर ती का झाली ह्याचा विचार करायला हवा.

'पण जरा चुकलोच हं... मला हे सर्व सांगण्याचा काय अधिकार. हे तुम्हाला सांगायची तशी चुकच झाली ना?'

# शारीरिक शिक्षण

## क्रीडाक्षेत्रातही बलशाली व्हावं!



***आपण*** २१ व्या शतकाची वाटचाल करीत असताना केवळ औद्योगिक, सांस्कृतिक, आर्थिक संपन्नतेबरोबरच क्रीडाक्षेत्रातही बलशाली झालं पाहिजे. नुकत्याच रिओ येथे पार पडलेल्या ऑलिंपिक स्पर्धांमध्ये सहभागी असणारा प्रत्येक खेळाडू आपल्या देशाचे राष्ट्रगीत जगाला ऐकविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करीत असलेला आपण पाहत होतो आणि सुवर्ण पदक मिळविणारे यशस्वी खेळाडू संपूर्ण जगाला ते ऐकवित होते; पण आपले भारतीय खेळाडू रोजच निराशा करीत होते. आपल्या देशाने एकूण १५ क्रीडा प्रकारात ६३ पुरूष आणी ५४ महिला असे एकूण ११७ खेळाडूंचा संघ पाठविला होता. ऑलिंपिकसाठी पाठविलेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा संघ होता. यामध्ये बॅडमिंटनमध्ये पी. व्ही. सिंधू व कुस्तीमध्ये साक्षी मलीक या दोन महिला खेळाडूंनी अनुक्रमे रौप्य व कांस्य पदक आपल्या देशाला मिळवून दिले. भारताला या ऑलिंपिक स्पर्धेमध्ये ६७ वे स्थान मिळाले.

चार वर्षापूर्वी लंडन येथील ऑलिंपिक सामन्यात भारताला सहा पदके मिळाली होती. कुस्तीमध्ये सुशीलकुमार व विजयकुमार यांना रौप्य, तर नेमबाज गगन नारंग, बॅडमिंटनपटू सायना नेहवाल, कुस्तीपटू योगेश्वर दत्त, महिला मुष्टियुद्धात मेरी कोम यांना कास्य पदके मिळाली होती; परंतु या वेळी दोन पदके ही आपली रिओ ऑलिंपिकची कमाई. याचा आपण क्रीडाप्रेमी, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी एकत्र बसून क्रीडाधोरणाचा योग्य विचार करण्याची वेळ आली आहे.

२०२० साली जपानमधील टोकिओ येथे होणाऱ्या ऑलिंपिकची तयारी आतापासूनच करायला हवी. त्याची सुरूवात शाळा, महाविद्यालय स्तरापासून करण्याची गरज आहे. आज आपल्या विद्यार्थ्यांमध्ये चांगले खेळाडू आहेत; पण त्याला पारखण्याची नजर आपल्या क्रीडा शिक्षकांची व प्रशिक्षकांची असायला हवी. असे खेळाडू शोधून त्यांना खेळाचे कौशल्य, तंत्र, नियम समजावून देत सतत प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

शाळेत शारीरिक शिक्षणाचा तास म्हणजे कवायत, मैदानाची साफसफाई, कदमताल यापर्यंत मर्यादित न ठेवता मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन, प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी याकडे फार गांभिर्याने पाहण्याची गरज आहे.

दिनांक २२ जून २०१५ व १६ सप्टेंबर २०१६ रोजी शासन निर्णयानुसार प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राबवित आहोत. यात सहशालेय उपक्रम तसेच क्रीडा विषयास महत्त्व देण्यात आले आहे. आपल्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांला खेळाबद्दल आवड निर्माण होईल तसेच मुलांमध्ये खेळासह सहज करता येण्याजोगे विविध शारीरिक व्यायाम प्रकार, योगाभ्यास याची सवय लागेल याची काळजी घेण्यात यावी असे सुचविलेले आहे. मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुलांशी संवाद साधताना 'प्रत्येक मुलाने रोज किमान एक तास घाम येईल असा व्यायाम करावा' असा संदेश दिला आहे.

प्राथमिक स्तरापासून प्रत्येक शाळेत अनुभवी, शारीरिक शिक्षणाची पदवी घेतलेल्या क्रीडाशिक्षकांची नेमणूक करणे गरजेचे आहे. यासाठी ठोस असा कार्यक्रम तयार करावा लागेल. क्रीडाशिक्षकांनी स्वत:च आपल्या विषयाचे महत्त्व वाढविले पाहिजे. शारीरिक शिक्षणाचा तास नियमित घेतला पाहिजे शाळेत शारीरिक शिक्षणाचा तास इतर विषयाचा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी देण्यापेक्षा शासनाने इयत्ता निहाय शारीरिक शिक्षणासाठी ठरवून दिलेला अभ्यासक्रम शिकविला पाहिजे. शारीरिक शिक्षणाच्या तासाला विद्यार्थ्यांना खेळायला वर्गाबाहेर सोडून देणे आणि क्रीडाशिक्षकांनी इतर काम करणे थांबविले पाहिजे. क्रीडाशिक्षकांनी क्रीडांगणावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना विविध खेळांची माहिती सांगितली पाहिजे व ते खेळ प्रत्यक्ष खेळायला शिकविले पाहिजे. खेळाचे सामने भरविले पाहिजेत, विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिलं पाहिजे. जेणे करून विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण होईल. खेळ, खेळण्याचे फायदे विद्यार्थ्यांना, पालकांना समजावून सांगितले पाहिजे. क्रीडा संस्कृती शाळा, घर, पालक, समाजात रूजविलं पाहिजे. आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना देशातील, जगातील प्रसिद्ध खेळाडूंचे खेळ पाहता येतात. झालेल्या सामन्यांचे निरीक्षण करता येते, खेळाडूची खेळाची पद्धत, वापरलेली कौशल्य, तंत्र, निर्णय घेण्याची पद्धती, याचा अभ्यास करता येतो, तसेच स्वत:च्या खेळाचे निरीक्षण करून चूका टाळता येतात. त्यामुळे क्रीडाशिक्षकांनी माहिती तंत्राज्ञानाचे ज्ञान अवगत करणे आजच्या युगात महत्त्वाचे आहे. तसेच क्रीडाक्षेत्रात होत असलेल्या बदलांबाबत अद्यावत माहिती मिळविली पाहिजे.

**शारीरिक शिक्षण व खेळाचे फायदे**

सर्वांगीन विकासाठी व्यायाम/खेळ अत्यंत गरजेचे आहे. नियमित खेळामुळे सुप्त गुण विकसित होण्यास मदत होते. खिलाडूवृत्ती, सहकार्यवृत्ती, नेतृत्वगुण, स्पर्धात्मकवृत्ती, एकाग्रता, सहनशीलता, आत्मविश्वास या गुणांचा विकास होतो. त्यासाठी व्यायाम आणि खेळात नियमितता आवश्यक आहे. त्याकडे दुर्लक्ष केले तर विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यासाठी आपल्याला आवडेल अशा खेळाचा नियमित सराव करणे व आपले आरोग्य चांगले ठेवणे हे प्रत्येक खेळाडूची जबाबदारी आहे. तर योग्य मार्गदर्शनासह सातत्यपूर्ण नियोजनबद्ध कठोर परिश्रम खेळाडूकडून करवून घेण्याची जबाबदारी प्रत्येक क्रीडाशिक्षकाची आहे.जर आपल्याला क्रीडाक्षेत्रात भारताचा नावलौकिक वाढवायचा असेल तर आपण सर्वजन शारीरिक शिक्षण विषयाकडे गांभिर्याने पाहू, कारण यातूनच पुढील तालुका, जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय खेळाडू तयार होणार आहेत व आपले राष्ट्रगीत जगाला ऐकविणार आहेत.

■ **उमेश खंडू थोपटे**
विषयतज्ज्ञ, पुणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था.
लोणी काळभोर, पुणे
९८८१६२२२६१


# अत्यंत महत्त्वाचे

**तुम्ही १८ ते ५५ या वयोगटातील स्त्री किंवा पुरुष आहात का?**

**कृपया त्वरित इकडे लक्ष द्या.**

## असल्यास तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे!

**केंद्र सरकारने तुमच्यासाठी एक पेन्शन योजना तयार केली आहे.**
**वय वर्ष साठ नंतर जिवंत असेपर्यंत तुम्हाला पेन्शन मिळणार आहे.**

- त्यामध्ये तुम्ही त्वरित पेन्शनखाते उघडणे गरजेचे आहे.
- १८ ते ५५ वयोगटातील स्त्री पुरुषांनी त्वरित पेन्शन नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

**त्वरित भेटा... पेन्शन गुरु : प्रा. क्षितिज पाटुकले**

**पेन्शन गुरु तुमच्यासाठी घेवून आले आहेत पेन्शन नियोजनाचे तंत्र आणि मंत्र, ज्यामध्ये आहे केंद्रसरकारच्या पेन्शन योजनेची संपूर्ण माहिती, मार्गदर्शन, सल्ला, सहाय्य, तुमच्या वयानुसार आर्थीक आणि गुंतवणूक नियोजनासाठी मार्गदर्शन... आणखी बरेच काही**

**संपूर्ण माहितीसाठी पहा : वेबसाईट :** www.pensionguru.in

**आणि अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटा –**
**पेन्शनगुरू द्वारा इंश्युरन्स ॲकॅडमी, ६२२, जानकी रघूनाथ, पुलाचीवाडी, झेड ब्रिजजवळ, डेक्कन जिमखाना, पुणे-४**
**वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ७.३० (रविवारी सुट्टी)**

**मोबाईल : ९४०३७६७७५४ / ०२०-२५५३४६०१**

ईमेल :- mail@pensionguru.in


'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस, सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे-४११ ०४१ येथे छापून ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२ Email : info@chaprak.com

अभिप्राय

# स्वत:ची वेगळी वाट असणारा दिवाळी अंक ‘चपराक’



प्रतिभासंपन्न ललित साहित्याने नटलेला ‘चपराक’चा दिवाळी अंक आहे. कल्पनेपेक्षा वास्तववादी साहित्य हे अंकाचे वैशिष्ट्य आहे. ग्रामीण सामाजिक समस्यांपासून ते जागतिक पातळीवरील समस्यांच्या संदर्भात या अंकातील अनेक लेख लक्षवेधी आहेत. रोखठोक वैचारिक लेखांमुळे अनेक बेगडी नेत्यांचे वस्त्रहरण झालेले दिसते. कुठेही भिडभाड नाही.

भयानक सामाजिक वास्तव, मेंढरी संस्कृती नव्याने रूजवू पाहणारे नेतृत्व, बेरकी राजकारणी, अनेक लेखातून दिसतात आणि सडेतोड भाषावैभवाने ‘चपराक’चे दालन समृद्ध झाले आहे, असे मला वाटते. ‘चपराक’चे संपादक घनश्याम पाटील आणि त्यांच्या टीमचे विशेष अभिनंदन करावसं वाटतं. बऱ्याच जणांना ते अप्रिय वाटेलही. या चारशे पंच्याहत्तर पानात कुठेच ‘राशी भविष्य’ नाही. प्रगत म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात असंख्य शिक्षितांचा ‘राशीभविष्य’ नितांत आवडीचा विषय आहे. प्रचलित चौकटीला हा धक्का आहे.

नवं काही करण्याची प्रेरणा देणारी खूप व्यक्तिचित्रे आणि अनुभव सांगणारी प्रामाणिक माणसे, त्यांचं यश-अपयश, वाचकाला आकृष्ट करतं. असंतोष, अतिरेक, दांभिक निर्लज्जपणा, यामुळे बिघडलेले सामाजिक पर्यावरण इत्यादींवर नामवंतांचे लेख परखडपणे व्यक्त झाले आहेत. लोकशाही व्यवस्थेत सामान्य माणूस पिचला गेल्याचं लक्षात येतं. मतलबी राजकारण्यांनी जातीपातीची कास धरल्यामुळे उद्दामपणा उजागर झाला आणि संवेदना संपली. गळे काढून रडण्याला प्रतिष्ठा मिळत आहे. एकूणच अशा बेताल मार्गवरचे आपण प्रवासी आहोत, साक्षीदार आहोत. ही अशी प्रवृत्ती समाजाला सर्वनाशाच्या खाईत ढकलू पाहत आहे. ‘चपराक’चा दिवाळी अंक वाचकाला जागरूक करू ईच्छितो.

याशिवाय अंकात प्रेरक असं खूप काही आहे. अशा प्रयोगशिल ‘चपराक’ परिवारास शुभेच्छा!

■ **अशोक अर्धापूरकर**
शशीदत्त, अंतुलेनगर, हिंगोली ४३१ ५१३
९६८९२३३३२४

## ‘साहित्य चपराक’चा दत्त जयंती विशेषांक



धर्म आणि अध्यात्म हा तर आपल्या संस्कृतीचा पायाच. तो मजबूत असल्यामुळेच आपल्या राष्ट्राची नीतिमत्ता टिकून आहे. आपल्या संस्कृतीत गुरूपरंपरेला अलौकिक महत्त्व आहे. येथील दत्तसंप्रदायाने ही परंपरा टिकवून ठेवली आहे. अवतार सातत्य हे दत्त संप्रदायाचे अनोखे वैशिष्ट्य! आजच्या जगात लाखो भक्तांना भिऊ नकोस, मी तुझ्या पाठिशी आहे’ असा मानसिक आधार देऊन भक्तांना सक्षम करण्यात या परंपरेतील संतांनी मोठे योगदान दिले आहे. त्यामुळेच साहित्य चपराक’ मासिकाचा डिसेंबर २०१६चा अंक दत्त जयंती विशेषांक म्हणून प्रकाशित केला आहे. या अंकाचे अतिथी संपादक आहेत, कर्दळीवन’ या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक आणि साहित्य सेतू’ संस्थेचे अध्यक्ष प्रा. क्षितिज पाटुकले. या अंकात दत्त संप्रदायातील अधिकारी आणि मान्यवर लेखकांचे साहित्य असल्याने तो संग्राह्य आणि तितकाच उपयुक्त झाला आहे. मुख्य म्हणजे भारताच्या कानाकोपऱ्यातील अपरिचित परंतु दैवी अनुभूती देणाऱ्या दत्त स्थानांची संपूर्ण माहिती, तेथील पत्ते, संपर्क क्रमांक, भक्तनिवास, भोजन, पारायणासह इतर सुविधांची माहिती असणारा विशेष विभाग हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. दत्त क्षेत्रांची अनुभूती घेण्यासाठी हा अंक अवश्य वाचा.

**अंक नोंदणीसाठी संपर्क :** ‘चपराक प्रकाशन’, पुणे ०२०-२४४६०९०९
या अंकाचे मूल्य - केवळ ४० रूपये । **सर्व विशेषांकासह वार्षिक वर्गणी - ५०० ₹**
ऑनलाईन पैसे भरून सभासद होण्यासाठी
या वेबसाईटला अवश्य भेट द्या - www.chaprak.com




## लोणी काळभोर येथे ’माणुसकीची भिंत’

**लोणी काळभोर, (प्रतिनिधी) :**
गरीब व गरजू लोकांना कपडे मिळावे यासाठी माणुसकीची भिंत या उपक्रमाचे लोणी काळभोर येथे आयोजन केले होते. ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र काळभोर याबाबत माहिती देताना म्हणाले, ‘‘समाजात अनेक गरीब व गरजवंत आहेत. त्यांच्यासाठी आपण काहीतरी चांगले काम केले पाहिजे या विचाराने परिसरातील सर्व मंडळाना बरोबर घेऊन हा उपक्रम राबविण्याचे ठरले. सर्व मंडळांनीही सहकार्य करत लोकांना या उपक्रमाबद्दल माहिती दिली. त्याप्रमाणे अनेक लोकांनी घरातील कपडे येथे लटकून ठेवले. समाजातील गरजू लोक ते कपडे घेऊन जात असल्याचे दिसले. त्यात थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर पण ठेवलेले दिसले. त्यामुळे गरजू लोकांना थंडीपासून बचाव करण्यासाठी मदत झाली.’’

यावेळी राजे शिव छत्रपती शिवराय प्रतिष्ठान, शिवशाही प्रतिष्ठान, दत्त नगर मित्र मंडळ, जगदंब मित्र मंडळ, हिंदवी स्वराज्य युवा मंच, अमरशक्ती मित्र मंडळ, गजानन मित्र मंडळ, रमण गायकवाड प्रतिष्ठान, शिवतेज मित्रमंडळ, म्हातारी आई मित्र मंडळ, पांडव प्रतिष्ठान, आलिशान मित्रमंडळ, जी.एम. ग्रुप व माळीमळा येथील नागरिकांनी हा उपक्रम राबविण्यासाठी सहकार्य केले.



संस्कृती प्रकाशन
६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, नू. म. वी. शाळेसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४९७३४३ मो. : ९८२३०६८२९२
sanskrutiprakashan@yahoo.com । www.sanskrutiprakashan.com